# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २२

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक २०/०८/२०२५ दुपारी ४-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ३. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ४. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| ८. | श्री चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| ९. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १०. | श्री संजय मोरे | कार्या. अधिक्षक |
| ११. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| १२. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १३. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १४. | श्री प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम |
| १५. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १६. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १८. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २०. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २१. | श्री अनिल भडागे | प्र. वाहन विभाग प्रमुख |
| २२. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २३. | श्री गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २४. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१८० मागील प्रशासकीय महासभा क्र.१७, १८, १९, २०, २१ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८० दिनांक २०/०८/२०२५**

मागील प्रशासकीय महासभा क्रमांक १७ दिनांक २२/०५/२०२५च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १५२ ते १६० अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच मागील प्रशासकीय महासभा क्रमांक १८ दिनांक ११/०७/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १६१ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक १९ दिनांक १४/०७/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १६२ ते १६९ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक २० दिनांक २३/०७/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १७० ते १७३ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक २१ दिनांक ०१/०८/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १७४ ते १७९ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८१ "अग्र नारी प्रांतीय महिला असोसिएशन" या संस्थे मार्फत स्वखर्चातून मालेगाव रोड येथील अग्रसेन चौक येथे माता माधवी सर्कल बनविण्यास मान्यता देण्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता अग्र नारी प्रांतिय महिला असोसिएशन या संस्थेतर्फे अग्रसेन चौक येथे सुशोभिकरणाबाबत पत्र आलेले होते. सुशोभिकरण हे सदरची संस्था स्वखर्चाने करणार आहे. परंतु सदरचा रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व धुळे पोलिस वाहतुक शाखा यांच्याकडुन नाहरकत होणे आवश्यक असल्याने ते आल्यावरच सदरच्या संस्थेला कामाबाबत पत्र देण्यात येईल. या अनुषंगाने सदरचा विषय मे. महासभेपुढे ठेवण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक असेच अजुन एक बारा पत्थर येथे महात्मा बसवेश्वर चौक आहे, त्याला मान्यता दिली का?

मा.उपअभियंता एक वर्षापुर्वी आले होते. लाईनआऊट देखील दिले ते नंतर आलेच नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता पुन्हा पत्र आले आहे. सन्मा. श्री. शशी मोगलाईकर यांच्याशी चर्चा देखील झाली आहे. आपण असे बऱ्याच ठिकाणी केले आहे. ते पत्र पाहुन ते देखील वर्कआऊट करा. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८१ दिनांक २०/०८/२०२५**

"अग्र नारी प्रांतीय महिला असोसिएशन" ही संस्था महाराष्ट्र राज्य अग्रवाल महिला संमेलन चालवते व गेली 25 वर्षे विविध सामाजिक कार्य करत आहे. तरी मालेगाव रोड, अग्रसेन चौक येथे पाच रस्ते एकत्र येतात व अपघात सुद्धा मोठ्या प्रमाणावर होतात ही बाब लक्षात घेऊन व धुळे शहराचे सुशोभीकरण होण्यासाठी “माता माधवी सर्कल” बनविणेस तयार असून आपणा मार्फत परवानगी मिळणे बाबत संदर्भीय कळविले आहे.

उक्त बाबत "अग्र नारी प्रांतीय महिला असोसिएशन" या संस्थे मार्फत स्वखर्चातून “माता माधवी सर्कल” बनविणेस तयार आहे. तरी मालेगाव रोड येथील अग्रसेन चौक हा सार्वजनिक बांधकाम विभाग मालकीचा आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग , धुळे व पोलीस वाहतूक शाखा यांच्या कडून ना- हरकत घेणे आवश्यक असल्याने या अटीवर मे.महासभेपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार "अग्र नारी प्रांतीय महिला असोसिएशन" या संस्थे मार्फत स्वखर्चातून मालेगाव रोड येथील अग्रसेन चौक येथे माता माधवी सर्कल बनविण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे व पोलीस वाहतुक शाखा यांच्या परवानगीच्या अधीन राहून मनपा अटी शर्तीनुसार वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८२ धुळे महानगरपालिका मालकीच्या खुली जागेत स्वखर्चाने जाहिरात फलक उभारणी करुन जाहिरातीसाठी वापरणे कामी वार्षिक जाहिरात, परवाना शुल्क, जागा भाडे, लायन्स फी भरुन नविन होडिंग उभारणेबाबत दर निश्चीती व मंजुरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. भांडारपाल धुळे शहरात सन २०१५-१६ पासुन २२२ नग होर्डिंग अस्तित्वात होते. त्यापैकी १०० होर्डीग हे अवैध असल्याने त्या काढुन टाकण्यात आल्या. त्यानंतर सदर जागेवर सदर जागेवर खाजगी ठेकेदार नियुक्ती करुन स्वखर्चाने पाहणी करण्याकरीता परवानगी दिली आहे. यातुन धुळे मनपा उत्पन्नात वाढ होणार आहे. त्यानुसार जाहीरात विभागामार्फत शहरातील सर्व जागांची पडताळणी करुन जागांची निश्चीती करण्यात आलेली आहे. तसेच जो दर आहे जो दर ३ वर्षांनी त्यात वाढ होणे अपेक्षीत होते परंतु १० वर्षांपासुन एकही होर्डीगधारकाला दर वाढवुन दिलेले नाही. दि. ९मे २०२२ च्या शासन निर्णयानुसार ३ वर्षानंतर वाढ करणे गरजेचे होते. त्यानंतर सध्या अस्तित्वात असलेले जे होर्डीग धारक आहेत त्यापैकी काही सोडले तर उर्वरीत जागा हया रिकाम्या आहेत. आपण परवानगी दिली तर मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव मे. महासभेपुढे ठेवण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सर्व्हे करुन किती जागा निश्चीत केल्या आता जेथे बोर्ड लावु शकतो.

मा.भांडारपाल सध्या १०० जागा निश्चीत केल्या आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला तिरकस बोर्ड लावले जातात. जयहिंद चौकात कठीण परिस्थीती आहे. सगळीकडे, आडवे, तिरकस बोर्ड लावलेले दिसतात. आता जी १०० संख्या सांगत आहात ती किमान २०० होईल इतपत जागा आहेत. त्यामुळे नविन पुन्हा सर्व्हे करावा. आणि जागा निश्चीत कराव्या. जेथे ॲक्सीडेंट होवु शकतात तेथे ना होर्डीग किंवा नो बॅनर करुन ऑलरेडी नोटीफाय केल्या आहेत. ते सुध्दा पाहुन घ्या. आणि जो डिफॉल्टर आहे, ज्याने पैसे भरले नाही, तसेच ज्यांना वाटते आम्ही शासनास जीएसटी भरता त्यामुळे मनपात पैसे भरणार नाही, हा त्यांचा स्टॅण्ड चुकिचा आहे. जे डिफॉल्टर आहेत ते या होर्डीगच्या जागांवर क्लेम करु शकत नाही. ज्याची थकबाकी आहे, त्याला बोर्ड लावु देता कामा नये. ते सर्व पाहुन रिव्हयु घेऊन पुन्हा विषय सादर करावा. आता परवा शांतता कमिटीची बैठक झाली त्यात देखील हा विषय झाला की, गणेशोत्सवाच्या निमीत्ताने जे बॅनर लागणार आहे. त्यात विना

परवानगी बोर्ड लागता कामा नये, याची दक्षता घ्यावी. जनसुराज्य फाऊंडेशनची जी PIL १५५ आहे, त्याचे व्हायलेशन जाणीवपुर्वक होत आहे असे रिमार्क आहे. त्यामुळे अनधिकृत बोर्ड लागले ते उचलले जातील हे पाहण्याचे काम अतिक्रमण विभाग प्रमुख प्रसाद जाधव यांचे राहिल. आणि बोर्ड वाल्यांना नोटीस देण्याचे काम जाहिरात विभागाचे राहिल. त्यांना वसुलीची नोटीस द्यावी. इलेक्शन वेळी ते सर्व वसुल होईल. यामुळे या सर्व गोष्टी दक्षतापुर्वक कराव्या. प्रत्येक बोर्ड बॅनर संदर्भात परवानगी चेक करावी. क्युआर कोड चेक केले जातील हे पहा.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८२ दिनांक २०/०८/२०२५**

धुळे महानगरपालिका शहरात उपलब्ध स्वमालकीच्या खुली जागेवर स्वखर्चाने जाहिरात होडिंग उभारणी करुन जाहिरात प्रसिध्द करणेसाठी जाहिरात परवाना, शुल्क, जागा, भाडे, लायन्स परवाना फी वसुल करणेत येते या करीता सदर होडिंग या खाजगी मालक यांनी लावलेले आहेत.

नविन जाहिरात फलक परवानगी उभारणी करीता ३(२) (क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामच्या कमल ७९ च्या आणि या नियमाच्या तरतुदीना अधिन राहुन महानगरपालिका निविदा मागवुन महानगरपालिका जमीनीवर पोटनियम (१) मध्ये नमुद केलेल्या विभिन्न स्वरुपातील जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी परवाना देता येईल त्यासाठी जाहिर निविदा मागविणेआवश्यक आहे.

तरी जागा निश्चित करुन त्यावर नविन होडिंग लावणेस मान्यता मिळवुन जुने दर व नविन प्राप्त दर समान करणेस मान्यता मिळवुन त्याकरीता ई-निविदा प्रसिध्द करणेस सदरचा विषय महासभे पुढे मान्यता मिळणे करीता सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार विभागामार्फत हद्दवाढ गावातील भागासह शहरातील सर्व जागा पुनश्च पडताळणी व पहाणी करुन जागांची निश्चीती करावी. व त्याप्रमाणे सुधारीत अहवाल सादर करावा. तोपावेतो सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८३ — धुळे महानगरपालिकेकरिता सुधारित आकृतीबंध मंजूर करावयाच्या अनुषंगाने शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या फेरकार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या.अधिक्षक — शासनाने १५० दिवसांच्या सेवापुर्ती कार्यक्रमात आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम सुधारणाकरीता सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने मागील महासभेत सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेल्या सुचनांनुसार मागील सभेत २३०३ पदांचा प्रस्ताव सादर केला होता. त्यामुळे वाहनचालक वर्ग-४ चे कर्मचारी आऊटसोर्सिंग व्दारे भरण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार ८३४ पदांचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. पुर्वीचे २२७४ व ५० व नव्याने ८३४ असे एकुण ३०५८ पदांचा आकृतीबंध मंजुरीसाठी शासनाकडे सादर करणे अनुषंगाने मे. महासभेत प्रस्ताव सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यात लॉ ऑफिसर पोस्ट यांचा समावेश आहे का?

मा.कार्या. अधिक्षक — आपल्याला यापुर्वीच ४ मार्च २०१३ च्या आकृतीबंधात याला मंजुरी मिळालेली आहे. विधी सल्लागार व उपविधी सल्लागार अशी दोन पदे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक मानधनावर ही दोन पदे भरुन घ्यावी. आपल्या केसेस सुप्रीम कोर्टात देखील चालु असतात. त्या ट्रॅक करण्यास कर्मचारी नाही. याची प्रोसेस सुरु करुन द्यावी. जाहीरात काढावी. परवा जो रिफॉर्मसचा विषय होता UIDF च्या कर्जाच्या अनुषंगाने त्यामध्ये हायड्रोलॉजिस्ट व एन्हायरमेंटल इंजिनियर त्या पदांचा देखील आकृतीबंधात समावेश करावा.

मा. कार्या.अधिक्षक त्या पदांचादेखील समावेश केला आहे. परिशिष्टात ८ व्या नंबरला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता मंत्रालयातील पेंडींग पडलेले वर्कआऊट करुन घ्यावे. GAD कडुन २-३ पदे सोडुन उर्वरीत पदांची मान्यतेसाठी फॉलोअप घ्यावा. जेणेकरुन भरती प्रक्रिया सुरु होईल. आता सफाई कामगारांची पदे किती घेतली आहे.

मा.कार्या. अधिक्षक ५०० पदे वाढवली आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता फायरची किती पदे घेतली आहे. अग्निशमन अधिकारी यांची, आपण मालेगांवकडुन सर्टिफिकेट घेतो.

मा.कार्या. अधिक्षक अग्निशमन अधिकारी वर्ग-१ या पदाचा देखील समावेश आहे. सहा. अग्निशमन अधिकारी आहेत. केंद्र अग्निशमन अधिकारी पदाचा समावेश आणि अग्निशमन विमोचक आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक आधीच आकृतीबंध हददवाढ कंसीडर करुन केलेला नाही. आता ११ गावे वाढल्यानंतर ४ अग्निशमन केंद्र चारही दिशांना असावी. या हिशोबाने ४ केंद्रांना आवश्यक असणारा स्टाफची आवश्यकता लागेल, तुम्हाला अजुन वाढवण्यास स्कोप आहे. ते वाढवायचे असेल ती पदेही यात टाकुन घ्यावे. पांझरा वॉटर येथील मुख्य अग्निशमन केंद्र सोडुन अजुन ४ केंद्र लागणार आहेत. ४ केंद्राचा स्टाफची पदे यात समाविष्ट करावी. रिव्हाईज करुन घ्यावे. तसेच यात परिवहन व्यवस्थापक पदाचा यात समावेश केला आहे, यापुर्वीच्या आकृतीबंधात नव्हते. परिवहचा जो स्टाफ लागतो त्यामध्ये परिवहन सेवेसाठी लागणारी जी काही पदे आहे. टर्नर/फिटर पासुन काही लोक असतील ती पदे देखील समाविष्ट करावी लागतील.

मा.कार्या. अधिक्षक संपुर्ण परिवहन विभागासाठीच्या पदांचा समावेश आपण आकृतीबंधात केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ज्याप्रमाणे विभागासाठी ऑफीसची प्रोव्हिजन देखील करावी लागेल. आता पीएमई बस सेवेची कामे त्वरीत करावी, ऑक्टोबर महिन्यापर्यंत झाली पाहिजे.सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८३ दिनांक २०/०८/२०२५**

राज्यशासनाच्या विविध धोरणांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात अधिकारी/कर्मचारी हे महत्वाची भूमिका पार पाडतात. या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी अदयावत असल्यास, अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यास प्रोत्साहन मिळले. ही बाबत विचारात घेता अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक ठरते त्या अनुषंगाने १५० दिवसाचा सेवाकर्मी कार्यक्रम (दिनांक ६ मे, २०२५ ते दिनांक २ ऑक्टोंबर, २०२५) या कालावधी मध्ये आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम सुधारणाकरीता सुचना दिलेल्या आहेत.शासनाने धुळे महानगरपालिकेसाठी ४ मार्च २०१६ रोजी एकूण २२७४ पदांचा आकृतीबंध मंजूर करुन दिला आहे.

तथापी १ जानेवारी २०१८ रोजी धुळे महानगरपालिकेची हदवाढ होऊन एकूण ११ ग्रामपंचयतीचा धुळे शहराच्या हदीत समावेशन झालेले आहे. पुर्वीचे क्षेत्रफळ ४६.४६ चौ.मी. इतके होते व हदवाढीचे क्षेत्रफळ ५४.६२ चौ.मी. आहे असे एकूण १०१.०८ चौ.मी. झालेले म्हणजेच सदरचे क्षेत्रफळ दुपटीने वाढ झालेली आहे. सदर आकृतीबंधानुसार धुळे महानगरपालिकेतील आजपावेतो कामकाज सुरु आहे. परंतु कालांतराने धुळे महानगरपालिकेतील विविध विभागातील वाढते कामकाज, आवश्यक कर्मचारी संख्या व नव्याने होणारे विभाग याकरीता अधिकारी/ कर्मचारी यांच्या सरळसेवा/ पदोन्नती

भरतीकरण्याबाबत राज्य शासनाच्या विविध धोरणांची परिणामकाकर अंमलबजावणी करण्यात अधिकारी/कर्मचारी हे महत्वाची भूमिका पार पाडतात.या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी अदयावत असल्यास, अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासा प्रोत्साहन मिळले. ही बाबत विचारात घेता अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक सुधारीत आकृतीबंध मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

म. आयुक्त तथा प्रशासक सो यांनी दिलेलेल्या निर्देशा प्रमाणे वाहनचालक, शिपाई, वॉचमन व इतर अनुषंगीक पदे वगळून तसेच शासन निर्देश तपासून अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी अदयावत असल्यास, शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यास व सेवा विषयक बाबी विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी सोबत परिशिष्ट १ ते ६ सुधारणेसह सादर करण्यात येत आहे. उक्त सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१(४) अन्वये शासनास मान्यतेस्तव सादर करण्याकरीता सदरचा विषय मान्यतेसाठी मे. महासभापूढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिकेकरिता सुधारित आकृतीबंध परिशिष्ट १ ते ६ मधील नमूद पदानुसार महानगरपालिका अधिनियम कलम ५१(४) अन्वये शासनास सादर करण्यास वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८४ धुळे महानगरपालिकेकरिता सुधारित सेवाप्रवेश नियम मंजूर करावयाच्या अनुषंगाने शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या फेरकार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक शासनाने धुळे मनपासाठी १६ फेब्रुवारी २०१६ अन्वये रोजीसेवाप्रवेश नियम मंजुर करुन दिला आहे. त्यात ११२ संवर्गाचे सेवाप्रवेश नियम मंजुर आहे. काही पदांचे सेवाप्रवेश मंजुर नव्हते. १५ डिसेंबर २०२२ ला प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यामध्ये ३४ पदांचे सुधारीत सेवाप्रवेश नियम मंजुर नव्हते आता आकृतीबंधात नव्याने पदे मंजुर करतोय असे १६७ पदांचा सेवाप्रवेश नियम मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी विषय मे महासभेपुढे सादर.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता १५० दिवसांची जी टाईमलाईन आहे. आपले प्रस्ताव मान्यतेसाठी गेले पाहिजे. तसेच १२६ पदांचे पद भरतीसाठी रिमाईंडर देवुन टाकावे. आणि त्यामध्ये पहिले अ व ब वर्गाचे पदे आहेत. ती ४ पदे व्यतीरीक्त आम्हाला मान्यता द्यावी. असे कळवा म्हणजे भरती प्रक्रिया करता येईल. अशा स्वरुपाचे पत्र मंत्रालयात द्यावे. तसेच ई गर्व्हनंसच्या बाबतीत १५० दिवसांच्या कालावधीत वेबसाईटच्या हिशोबाने ते देखील पाहुन घ्या. तसेच आता सर्व फाईल्स, ई ऑफिस माध्यमातुन गेल्या पाहिजे. ई ऑफिस, ई टपाल सुरु झाले आहे. इथुन पुढे फाईल्स फिजीकली फिरणार नाही. ती अंतिम मान्यतेसाठी माझ्याकडे ई ऑफिस प्रणाली मधुनच येईल याची दक्षता घ्यावी. तुमच्या सगळयांचे सादरीकरणाचे टप्पे कमी केले आहे. तसेच आपण जे एनओसी देतो व नगरविकास विभागाने, नोटीफाय केलेल्या ७३ सर्विसेस आहे त्यात प्रॉपर्टी टॅक्स वाल्यांच्या जास्तीच्या सर्विसेस आहेत. त्या राईट टु सर्व्हिसेस मधुन द्याव्या. जे तुमच्याकडे ॲप्लीकेशन येतील ते ऑनलाईन करावे. ऑनलाईन सिस्टीम मधुनच ते दाखले

जातील याची दक्षता घ्यावी. IGR ला दाखल केलेल्या प्रॉपर्टीज शहरातल्या सर्व कनेक्ट केल्या. हददवाढ भागातील प्रॉपर्टीज कलेक्ट करुन घ्या म्हणजे रिअल टाईम जे काही व्यवहार झाले तर नोटीफिकेशन येण्यास सुरुवात होतील. इथुन पुढे सगळया सर्विसेसचे दाखले एनओसी ऑनलाईन द्यावेत. सर्व विभागप्रमुखांनी आपल्या फाईल्स ऑनलाईन येतील हे पहावे. ज्याच्या घेणार नाही त्यांना पेनल्टीज लागतील. सर्वांनी ई ऑफिस प्रणालीबाबत शिकुन घ्या. ज्यांना अडचण येत असेल त्यांना NIC कडुन प्रशिक्षण घ्यावे. इथुन पुढे लोकांना आपल्यापर्यंत यायला लागु नये हाच आपला प्रयत्न असेल. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८४ दिनांक २०/०८/२०२५**

राज्य शासनाच्या विविध धोरणांची परिणामकाकर अंमलबजावणी करण्यात अधिकारी/कर्मचारी हे महत्वाची भूमिका पार पाडतात. या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी अदयावत असल्यास, अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासा प्रोत्साहन मिळले. ही बाबत विचारात घेता अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक ठरते त्या अनुषंगाने १५० दिवसाचा सेवाकर्मी कार्यक्रम (दिनांक ६ मे, २०२५ ते दिनांक २ ऑक्टोंब,२०२५) या कालावधी मध्ये आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम सुधारणाकरीता सुचना दिलेल्या आहेत.

शासनाने धुळे महानगरपालिकेसाठी १६ फेब्रुवारी २०१६ अन्वये रोजी एकूण ११२ सवंर्गाचे सेवाप्रवेश नियम मंजूर करुन दिलेले आहे.शासनाने धुळे महानगरपालिकेसाठी एकूण ३४ पदांचे सुधारीत सेवाप्रवेश नियम मंजुर करुन दिलेले आहेत.

तसेच १ जानेवारी २०१८ रोजी धुळे महानगरपालिकेची हदवाढ होऊन एकूण ११ ग्रामपंचयतीचा धुळे शहराच्या हदीत समावेशन झालेले आहे. पुर्वीचे क्षेत्रफळ ४६.४६ चौ.मी. इतके होते व हदवाढीचे क्षेत्रफळ ५४.६२ चौ.मी. आहे असे एकूण १०१.०८ चौ.मी. झालेले म्हणजेच सदरचे क्षेत्रफळ दुपटीने वाढ झालेली आहे. सदर आकृतीबंधानुसार धुळे महानगरपालिकेतील आजपावेतो कामकाज सुरु आहे. परंतु कालांतराने धुळे महानगरपालिकेतील विविध विभागातील वाढते कामकाज, आवश्यक कर्मचारी संख्या व नव्याने होणारे विभाग याकरीता अधिकारी/ कर्मचारी यांच्या सरळसेवा/ पदोन्नती भरतीकरण्याबाबत राज्य शासनाच्या विविध धोरणांची परिणामकाकर अंमलबजावणी करण्यात अधिकारी/कर्मचारी हे महत्वाची भूमिका पार पाडतात.या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी अदयावत असल्यास, अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासा प्रोत्साहन मिळले. ही बाबत विचारात घेता अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक सुधारीत आकृतीबंध मंजूरी घेण्याबाबत प्रसतावित करण्यात आलेले आहे.

धुळे महानगरपालिका मुख्य सेवाप्रवेश नियम, २०१६ मधील विहीत अर्हता सदयास्थित कालबाहय व सध्याच्यामंजूर आकृतीबंधानुसार सुसंगत नाही. तसेच धुळे महानगरपालिका सुधारित सेवाप्रवेश नियम -२०२२ मध्ये एकूण ३४ पदांचा सुधारित सेवाप्रवेश नियम २०२२ व सध्या प्रस्तावित करण्यात आलेला सुधारित आकृतीबंधानुसार सुसंगत व एकत्रित सेवाप्रवेश नियम विहित करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सर्व संबधित विभाग प्रमुख यांचेशी चर्चा करुन धुळे महानगरपालिकेकरीता करावयाचा सुधारित आकृतीबंधचा प्रारुप मसूदा एकूण परिशिष्ट -१ ते परिशिष्ट -४ नुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५७(३) अन्वये शासनास मान्यतेस्तव सादर करण्याकरीता सदरचा विषय मान्यतेसाठी मे. महासभापूढे सादर करण्यात आलेला होता.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिका मुख्य सेवाप्रवेश नियम-२०१६ व सेवाप्रवेश नियम-२०२२ मधील विहीत अर्हता व सध्या प्रस्तावित करण्यात आलेला सुधारित आकृतीबंधानुसार सुसंगत व एकत्रित सेवाप्रवेश नियम विहित करणे आवश्यक असल्याने परिशिष्ट -१ ते परिशिष्ट -४ मधील नमूद बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७(३) अन्वये शासनास सादर करण्यास वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८५ — धुळे शहर पी.एम. ई बससेवा सुरु करणेकामी पर्यवेक्षक पदावर मानधन पध्दतीने अधिकारी नियुक्तीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक — म. उपअभियंता, बांधकाम यांनी दि.१४/७/२०२५ रोजी अहवाल सादर करुन धुळे मनपा अंतर्गत धुळे शहरात पीएमई बस सेवा सुरु होणार असुन शासन निर्णयानुसार बस वाहुतक साठी आगार व्यवस्थापक, वाहतुक नियंत्रक यांची आवश्यकता आहे. बस सेवेचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त / माजी कर्मचारी यांची मानधनावर नियुक्ती करार पध्दतीने करुन घेणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे. त्यानुसार म.रा.प.म. धुळे विभाग यांचे सेवानिवृत्त कर्मचारी यांचे अर्ज प्राप्त झाले होते. परंतु दि.१०/६/२०२५ सामान्य प्रशासन विभागाकडील GR नुसार आपल्या वर्तमानपत्रात जाहिरात देवुन नियुक्ती करणे योग्य राहिल.

मा.आयुक्त तथा प्रशासक — ही सगळी प्रक्रीया योग्य पध्दतीने पार पाडावी. आपल्याकडे ३ महिनेचा कालावधी हातात आहे. मधल्या काळात जाहिरात प्रक्रिया करुनच हे करावे. टेंडरची प्रोसिजर पुर्ण झालेली नाही. बस येण्याआधी सर्व पुर्ण झाले पाहिजे. आपण आता सुरुवात करणार आहोत म्हणुन सर्व कॉन्ट्रॅक्चुअल असेल. यासाठी सरकारी एजन्सीज ॲप्रोच व्हा. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८५ दिनांक २०/०८/२०२५**

म. उपअभियंता, बांधकाम विभाग यांनी दि १४/७/२०२५ रोजी अहवाल सादर करुन नमुद केले की, धुळे महानगरपालिका अंतर्गत धुळे शहरात पी. एम. ई - बस सेवा सुरू करण्यात येणार असून धुळे महानगरपालिके येथे ट्रान्सपोर्ट डीपार्टमेंट अस्तित्वात नसून प्रशासकिय महासभा क्र ०५ दि. २५/०७/२०२४ अन्वये समिती स्थापन करण्यासाठी ठराव पारित करण्यात आलेला आहे. शासन निर्णयानुसार Bus Operation साठी आगार व्यवस्थापक, वाहतुक नियंत्रक यांची आवश्यकता असून धुळे मनपाच्या कायम आस्थापना वर आगार व्यवस्थापक, वाहतुक नियंत्रक हे अधिकारी कर्मचारी नसून बस सेवाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त/माजी कर्मचारी यांची मानधनावर नियुक्ती करार पद्धतीने करून घेणे आवश्यक आहे.

धुळे महानगरपालिका अंतर्गत धुळे शहरात पी. एम. ई-बस सेवा सुरू करण्यात येणार असून धुळे महानगरपालिके येथे ट्रान्सपोर्ट डीपार्टमेंट अस्तित्वात नसून प्रशासकिय महासभा क्र. ०५ दि. २५/०७/२०२४ अन्वये समिती स्थापन करण्यासाठी ठराव पारित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने जा क्र /धुमपा/आस्था/ ४९९ दि. १४/७/२०२५ अन्वये सदर उपक्रम राबविणेबाबत समिती गठीत करणेत आलेली आहे.

शासन निर्णयानुसार करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी नेमणुक करताना विहित पध्दतीने जाहिरात देवून विवक्षीत कामासाठी पात्र सेवा निवृत्त अधिकारी यांचेकडून अर्ज मागविणे व उमेदवारांची तसेच पात्र उमेदवारांची निवड करुन नामसूची नियुक्ती साठी सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करावी असे नमुद केलेले आहे.तरी शासन निर्णयानुसार धुळे शहरात ई-बस सेवा सुरू करण्याकरिता मानधनावर वाहतूक नियंत्रक या पदासाठी अधिकारी नियुक्ती करण्याबाबत (सेवानिवृत्त/माजी कर्मचारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ) जाहिरात प्रसिध्द करणे योग्य होईल. याबाबतचा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार धुळे शहर पी.एम. ई बससेवा सुरु करणेकामी पर्यवेक्षक पदावर शासननिर्णयानुसार मानधन तत्वावर करार पध्दतीने नियुक्ती करणेकामी विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्दी करुन कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे. नेमणुक करणेस वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१८६ — सर्व्हे नं. 28/2 (सि. स. नं. 4760/अ व 4760/ब) जुना आग्रा रोड, देवपुर ता. जि. धुळे येथे व्यापारी संकुल (आरक्षण क्र. 42), म्युनिसिपल पर्पज इमारत (आरक्षण क्र. 43) विकसीत करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — जुना आग्रारोड देवपुर धुळे येथे नवरंग पाणी टाकी येथे मनपा मालकीची ४ एकर जागा आहे. त्यात अस्तित्वातील ४ आरक्षण आहे. मागे ठरावानुसार वास्तुविशारद यांची नेमणुक केली होती. त्यांनी तयार केलेला प्रकल्प अहवाल नुसार अंदाजित अधिमुल्य (प्रिमीयम) मे. स्थायी समिती ठराव नं. २०८ दि.२४/१/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली होती. तरी आरक्षण क्र.४२ व क्र.४३ याबाबत प्रस्ताव दिलेले आहे. आरक्षण निश्चीतीसाठी हा प्रस्ताव मे. महासभेपुढे ठेवण्यात आला आहे. तसेच वास्तु विशारद यांची नेमणुक करावयाची आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आता अस्तित्वातील मंजुर झालेला डीपी आहे. त्याचा हा पार्ट आहे. आता आपण हे रिव्हाईज करतोय कलम ३७ खाली प्रस्ताव पाठवले आहे. ते वर्कआऊट झाले नाही आपण ELU प्रोसेस येईल जे काय आरक्षण आहे. PLU मध्ये ते सर्व आपल्या स्तरावर बदल करु शकतो. ते पुर्ण कमर्शिअल करु शकतो. आता एकच गोष्ट करायची पलीकडील अर्धा एकरचा तुकडा आहे. शॉपिंग कॉम्प्लेक्स वाले आरक्षण आहे तेवढया तुकडयाचे शॉपिंग कॉम्प्लेक्सचे प्रपोजल DPDC ला द्यायचे आहे. आणि नवरंग पाणी टाकी येथे भाजीवाल्यांसाठी व्यवस्था केली आहे. या बाजुला म्युन्सीपल पर्पजवाले आरक्षण आहे. तेथे भाजी मार्केट विकसीत करण्याचे प्रपोजल प्रस्तावित करावे. तो देखील DPDC ला द्यावा. पुढील ६ महिन्यात भाजी मार्केट तयार करावे. त्याचा प्लॅन पासुन सर्व वर्कआऊट करावे. साधारण २५० ओटे असावे भाजी विक्रेते, फळ विक्रेते तेथे बसतील या हिशोबान २५० ओटयांची सोय असलेले भाजी मार्केट करावे. तेथे एकही शाळाधारक असणार नाही. मा.पालकमंत्री व आमदार महोदयांशी याबाबत चर्चा झाली आहे. निधीसाठी जो कोणी आर्किटेक्ट आहे त्यांच्याकडुन प्राधान्याने ते करुन घ्या. BOT किंवा म्युनिसिपल फंड किंवा विकास शुल्क किंवा DPDC किंवा शासन मुलभुत सोई सुविधा हे सर्व पर्याय खुले राहतील हे पर्याय टाकुन ज्यातुन निधी उपलब्ध होईल

त्यातुन ते करण्यास मान्यता राहिल. पुढील सहा महिन्यात भाजी मंडई झाली पाहिजे.सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८६ दिनांक २०/०८/२०२५**

जुना आग्रा रोड, देवपुर येथील सर्व्हे नं. 28/2(सि.स.नं. 4760/अ व 4760/व) आयुक्त निवासस्थान (आरक्षण क्र.40),बगीचा (आरक्षण क्र. 41), व्यापारी संकुल (आरक्षण क्र. 42) व म्यु. पर्पज (आरक्षण क्र. 43) साठी धुळे शहर मंजूर विकास योजनेत आरक्षित आहे.

वर नमुद आरक्षणांपैकी आरक्षण क्र. 42 व आरक्षण क्र. 43 या जागांवर B.O.L.T तत्वावर अनुक्रमे शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि म्यु: पर्पज यात मोडणा-या बाबींचे बांधकाम करणे प्रस्तावित होते. सदर जागा मनपा मालकीची असून सद्यस्थितीत मनपाच्या ताब्यात आहे.

उक्त बाबत जागा मालकी धुळे मनपाची असल्याने, धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं. 20 दि. 06/05/2014 तसेच धुळे महानगरपालिका ठराव क्र. 209 दि.13.01.2016 अन्वये प्रस्तावित जागेवर वास्तुविशारद तज्ञ यांचे कडून स्पर्धात्मक आराखडे मागविणेबाबत मंजुरी देण्यात आली होती. याकामी धुळे मनपाने ई-निविदा सुचना क्र.317 दि.17.09.2020 अन्वये मागविण्यात आली असता त्यात सर्वात कमी दराची मे. सावकार प्लॅनर्स, नाशिक यांची निवीदा धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.113दि. 22/12/2020 अन्वये मंजुर करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांना इकडील कार्यालया मार्फत जा.क्र.05दि.06/04/2021 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता.

त्यानुसार मे. सावकार प्लॅनर्स नाशिक यांनी तयार केलेला प्रकल्प अहवाल नुसार व याकामी कार्यालयीन अहवालात निश्चित केलेल्या अंदाजित अधिमूल्य (प्रिमीयम) रक्कमेस मे.स्थायी समिती ठराव नं.208 दि.24/01/2022 अन्वये मान्यता देण्यात आली होती.तथापि याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

तसेच याकामी नगररचना विभागामार्फत स.नं.28/2 मधील संपूर्ण जागेवर वाणिज्य वापर करणे बाबत अंतिम प्रस्ताव शासनाकडेस सादर केलेला आहे.सदरची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

तरी यापूर्वी झालेली प्रक्रिया व स्थायी समिती ठराव रद्द करून सर्व्हे नं. 28/2 (सि. स. नं. 4760/अव 4760/ब) जुना आग्रा रोड, देवपुर ता. जि. धुळे येथे व्यापारी संकुल (आरक्षण क्र. 42), म्युनिसिपल पर्पज (आरक्षण क्र. 43) याबाबत UDCPR मध्ये Any public purpose related with functioning of Municipal Authority as may be decided by the Authority असे नमूद आहे.त्यानुसार व्यापारी संकुल (आरक्षण क्र. 42) व म्युनिसिपल पर्पज (आरक्षण क्र. 43) या ठिकाणी नव्याने व्यापारी संकूल विकसनासाठी मनपाचे आर्थिक हित लक्षात घेवून शासनाच्या वेगवेगळया योजना, शासन निधी किंवा मनपातर्फे ऑन स्पॉट गाळयांचे लिलाव करून निधीची उपलब्धता करून घेणेस तथा किंवा व्यापारी सकुंलाचे विकसन करण्यास B.O.T., B.O.L.T., B.O.O.T किंवा P.P.P.O माध्यमातून प्रकल्प विकसित करणे व सदर कामी अंदाजपत्रक, नकाशे व निविदा प्रपत्रे तयार करण्यासाठी मनपा पॅनल वरील वास्तूविशारद श्री.आनंद खैरनार, पुणे यांची नेमणूक करणे बाबत धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे. तसेच याबाबत मा. श्री अनुपभैया अग्रवाल आमदार, धुळे शहर यांनीही पत्र देऊन सदर प्रस्तावावर कार्यवाही करणेबाबत सुचित केलेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार सर्व्हे नं. 28/2 (सि. स. नं. 4760/अ व 4760/ब) जुना आग्रा रोड, देवपुर येथे (आरक्षण क्र. 42) व्यापारी संकुल विकसित करणेस तसेच म्युनिसिपल पर्पज इमारत (आरक्षण क्र. 43) येथे भाजी मंडई विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे. तत्पुर्वी प्रस्तावात नमूद आरक्षणे विकसित

करणेसाठी यापूर्वी महासभा ठराव क्रमांक २०९ दिनांक १३/०१/२०१६ व मे. स्थायी समिती मार्फत झालेले ठराव रद्द करण्यात येत आहे. तसेच यापूर्वी नियुक्त वास्तू विशारद यांना दिलेला कार्यादेशही रद्द करण्यात येत आहे. सदरचे व्यापारी संकुल व भाजी मंडई विकसनासाठी मनपाचे आर्थिक हित लक्षात घेवून शासनाच्या वेगवेगळया योजना, शासन निधी, मनपा निधी किंवा मनपातर्फे ऑन स्पॉट गाळयांचे लिलाव करून निधीची उपलब्धता करून घेणेस किंवा व्यापारी सकुंलाचे विकसन करण्यास B.O.T., B.O.L.T., B.O.O.T किंवा P.P.P.O माध्यमातून प्रकल्प विकसित करणे तथा जिल्हा नियोजन मंडळाकडे निधी मागणी प्रस्ताव सादर करणे या पर्यायांचा अवलंब करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामी अंदाजपत्रक, नकाशे व निविदा प्रपत्रे तयार करण्यासाठी मनपा पॅनल वरील वास्तूविशारद श्री.आनंद खैरनार, पुणे यांची नियुक्ती करणेसही मान्यता देणेत येत आहे.

सदर ठिकाणी साधारणत: अद्ययावत सोयी सुविधांसह सुमारे २५० ओटेधारक सामावतील यापध्दतीने आराखडा करणेबाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**